# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-28.05.2026** **वार- गुरुवार**

---

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज्यातल्या अनेक प्रश्नांवर त्यांनी पंतप्रधानांशी चर्चा केली, तसंच राज्यातल्या अनेक प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीची माहिती त्यांना दिली.

**<u>स्वातंत्र्यवीर सावरकर</u>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांनी सावरकर यांना अभिवादन केलं. पुण्यात विविध संस्था, संघटनांच्या वतीनं व्याख्यानं, गीत-गायन, अभिवाचन यासारख्या कार्यक्रमातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्याचं स्मरण केलं जात आहे. पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे यांनी आज सावरकर स्मारक स्थळी त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. मसापचे अध्यक्ष, अभिनेते योगेश सोमण, यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपमहापौर शर्मिला बाबर यांनी सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

**<u>बकरी ईद</u>**

मुस्लिम बांधवांचा पवित्र सण बकरी ईद आज पुणे आणि परिसरात उत्साहात साजरा होत आहे. पुण्यातील ईदगाह आणि मशिदींमध्ये आज नमाज अदा करण्यात आली. परस्परांना शुभेच्छा देत मुस्लिम बांधवांनी हा सण उत्साहात साजरा केला.

**सीयूईटी**

बकरी ईदमुळे पुढे ढकलण्यात आलेल्या, पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या सी यू ई टी- यूजी या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक राष्ट्रीय चाचणी संस्थेने आज जाहीर केलं. या परीक्षा आता 31 मे, तसंच 6 आणि 7 जून रोजी घेतल्या जातील. 31 मे रोजी होणाऱ्या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रं प्रसिद्ध करण्यात आली आहेत; ती cuet.nta.nic.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील, अशी माहिती संस्थेने दिली आहे.

**पीएमए**

मानव जातीसह निसर्गातील प्रत्येक घटकाला एक कुटुंब मानलं, तर निश्चितच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल, असा विश्वास निवृत्त सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी काल पुण्यात व्यक्त केला. पुणे मॅनेजमेंट असोसिएशनच्या 49व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'विकसित भारत' ही या कार्यक्रमाची संकल्पना होती. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ति आणि संस्थांना गौरवण्यात आलं. आयएमडीआर, टाय, स्वरूपवर्धिनी, या संस्थांचा यात समावेश आहे. नेतृत्व क्षेत्रातील श्वेता शालिनी, उद्योजक गौरव त्रिपाठी यांचाही गौरव करण्यात आला.

**मुणगेकर**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांच्या वतीनं पुण्यात काल एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. 'नेहरू प्रणित भारताच्या विकासाचं प्रतिमान आणि त्याची प्रासंगिकता' या विषयावर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचं यावेळी व्याख्यान झालं. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सेवियत युनियन या दोन देशात जग विभागलेलं असताना, स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखून पंडित नेहरूंनी तिसरी शक्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असं प्रतिपादन मुणगेकर यांनी केलं.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150व्या दीक्षांत संचलनापूर्वीची रंगीत तालीम आज उत्साहात पार पडली. 30 मे रोजी होणाऱ्या या भव्य सोहळ्यात 355 कॅडेट्स भारतीय सशस्त्र दलात अधिकारी म्हणून दाखल होणार आहेत. या सोहळ्यात भारतीय हवाई दलाकडून नेत्रदीपक हवाई प्रात्यक्षिकं सादर केली जाणार आहेत. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी दीक्षांत संचलन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**नसरापूर**

नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी भीमराव कांबळे यांचा विरोधात न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. या प्रकरणाची सुनावणी आता रोज 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. घटनेनंतर अवघ्या पंधरा दिवसांत पोलिसांनी दोषारोपपत्र दाखल केलं होतं. त्यावर आज सुनावणी पार पडली.

**कृषि आवाहन**

शेतकऱ्यांनी यंदाच्या खरीप हंगामामध्ये केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. स्फुरदयुक्त एसएसपी हे खत देशातंर्गत तयार होतं; तेलबियांसह विविध पिकांसाठी ते फायदेशीर आहे; त्यामुळे फक्त डिएपी खताच्या ऐवजी युरिया आणि एसएसपी या अन्य खतांचाही वापर केला, तर तो डिएपीला चांगला पर्याय ठरेल, असं कृषि विभागानं म्हटलं आहे.

**हवामान**

पुण्यात आज कमाल 37 आणि किमान 24 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस तापमानची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**